पूरक पोषण आहार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या खिचडी करीता लागणारी तूरडाळ महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेकडून पुरवठा तसेच कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन शुध्दिपत्रक क्रमांकः एबावि-२०१७/प्र.क्र.१३६/का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ९ मे, २०१८

वाचा :- (१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक सपस २०१७/प्रक्र १९८/२४स, दिनांक २३ ऑक्टोबर,२०१७, दिनांक १६.४.२०१८ व दिनांक २०.४.२०१

(२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१७/प्रक्र १३६/का-५, दिनांक ७ मे, २०१८

प्रस्तावना :-

केंद्र पुरस्कृत पुरक पोषण आहार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या खिचडी या आहाराकरीता राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी केंद्रावर आवश्यक असणा-या तुरडाळ ही राज्य शासनाने आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यातील शेतक-यांकडून खरेदी केलेल्या तूरीपासून महाराष्ट्र राज्य सहाकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेमार्फत भरडाई करुन विक्रीकरीता उपलब्ध करुन दिलेल्या तुरडाळीमधून खरेदीकरण्यास मान्यता देण्याची तसेच विनियोगाची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने संदर्भाधिन क्र. २ प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि, स्थानिक स्तरावरील अडचणी लक्षात घेता तूरडाळीच्या वाहतूकीसंदर्भात अधिक स्पष्टता येण्याकरिता या विभागाच्या दि.७.५.२०१८ च्या उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

शासन शुध्दिपत्रक :-

संदर्भाधिन क्र. २ येथील शासन निर्णय दि. ७.५.२०१८ मधील परिच्छेद क्र. २ मधील मुद्दा क्र. ३ खालीलप्रमाणे वाचावा-

३. पूरक पोषण आहाराकरीता आवश्यक असणा-या तूरडाळीचा पुरवठा हा प्रकल्प निहाय न करता तो अंगणवाडी निहाय महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांचेमार्फत करण्यात यावा. त्यामूळे याकरीता वेगळयाने वाहतूक खर्चाकरिता महिला व बाल विकास विभागाकडून कुठलीही आर्थिक तरतूद करण्यात येणार नाही. अंगणवाडीस्तरावर मागणीनुसार नियोजित वेळेत तूरडाळीच्या पुरवठयाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई यांची राहील. त्याचप्रमाणे तुरडाळीचा विनियोग लाभार्थीकडून झाल्याबाबत प्रमाणीत करण्याची व पणन महासंघाला पोहोच पावती देण्याची जबाबदारी ही संबंधीत महिला व बाल विकास अधिकारी (जि.प.) व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांची राहील.

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५१०११०५५३००३० असा आहे. हे शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.05.10 11:06:31 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
६) अतिरिक्त मुख्य सचिव (पणन), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
८) सह सचिव (श्री गुजर)/उप सचिव (श्रीम.निवतकर), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) व्यवस्थापकीय संचालक, दि महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. कन्मूर हाऊस, मस्जीद बंदर, मुंबई.
१०) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
११) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) सर्व जिल्हाधिकारी.
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१५) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी(जिल्हा परिषद).
१६) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी).
१७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) निवड नस्ती (कार्यासन-५), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

****